www.prepp.in

Your Personal Exams Guide

Test Booklet Code &No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

**A**

# Paper-III
# ECONOMICS

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

**MAY - 11316**

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.prepp.in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

MAY - 11316/III—A

# ECONOMICS
## Paper III
## अर्थशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This Question Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Who assumed elasticity of demand for money equal to 1 ?
   (A) Mill
   (B) Hicks
   (C) Marshall
   (D) Samuelson

2. Consider the following statements :
   (I) The numerical tables attached to indifference curves are meaningful only in an ordinal way.
   (II) The numerical meanings attached to isoquants are meaningful in an ordinal way.

   Select the *correct* answer from the given below :
   (A) (I) is true and (II) is false
   (B) (I) is false and (II) is true
   (C) both (I) and (II) are true
   (D) both (I) and (II) are false

1. पैशाच्या मागणीची लवचिकता 1 असते असे खालीलपैकी कोणी मानले ?
   (A) मिल
   (B) हिक्स
   (C) मार्शल
   (D) सॅम्युअलसन

2. खालील विधाने विचारात घ्या :
   (I) तटस्थता वक्राबरोबरील संख्यात्मक तक्ता क्रमदर्शी पद्धतीनेच योग्य ठरतो.
   (II) समउत्पादन वक्राबरोबरील संख्यात्मक तक्ता क्रमदर्शी पद्धतीनेच योग्य ठरतो.

   खालीलपैकी **योग्य** पर्याय निवडा :
   (A) विधान (I) बरोबर असून विधान (II) चूक आहे
   (B) विधान (I) चूक असून विधान (II) बरोबर आहे
   (C) (I) व (II) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत
   (D) (I) व (II) ही दोन्ही विधाने चूक आहेत

www.prepp.in



3. If indifference curves are concave to the origin then at tangency point between indifference curve and budget line is :

(A) $MRS_{XY} < \frac{P_X}{P_Y}$

(B) $MRS_{XY} = \frac{P_X}{P_Y}$

(C) Consumer is worse off

(D) Both (B) and (C)

4. Suppose demand curve for X shifts rightwards due to increase in consumer's income. The price elasticity of demand for X in numerical value :

(A) decreases at every price

(B) decreases at the price that prevailed before the change in income

(C) increases at every price

(D) increases at every price that prevailed before the change in income

3. जर तटस्थता वक्र आलेखाच्या आरंभस्थानाशी अंतर्गोल असतील तर तटस्थता वक्र आणि अंदाजपत्रकी रेषेच्या स्पर्शबिंदूच्या जागी .....

(A) $MRS_{XY} < \frac{P_X}{P_Y}$

(B) $MRS_{XY} = \frac{P_X}{P_Y}$

(C) उपभोक्त्याचे समाधान कमी होते

(D) वरीलपैकी (B) व (C) हे बरोबर

4. उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे जर मागणी वक्र उजवीकडे उचलला गेला तर 'क्ष' वस्तूच्या किंमत लवचिकतेचा सहगुणक :

(A) प्रत्येक किंमतीस कमी असेल

(B) उत्पन्न वाढ होण्यापूर्वीच्या प्रत्येक किंमतीला कमी असेल

(C) प्रत्येक किंमतीस जास्त असेल

(D) उत्पन्न वाढ होण्यापूर्वीच्या प्रत्येक किंमतीस जास्त असेल

www.prepp.in



5. Suppose the demand curve is downward sloping and supply curve is positively sloping. Imposition of tax would :

(A) increase producer's surplus

(B) reduce consumer's surplus

(C) leaves producer's surplus unchanged but reduces consumer's surplus

(D) leaves consumer's surplus unchanged but increases producer's surplus

6. The costs that do not vary with the level of output but can be avoided at zero level of output are :

(A) Sunk costs

(B) Total costs

(C) Fixed costs

(D) Implicit costs

5. मागणीचा वक्र जर खाली उतरत जाणारा असेल व पुरवठा वक्र धन स्वरूपाचा असेल आणि जर कर आकारणा गेला, तर :

(A) उत्पादकाचे संतोषाधिक्य वाढेल

(B) ग्राहकाचे संतोषाधिक्य घटेल

(C) उत्पादकाचे संतोषाधिक्य अबाधित राहील पण ग्राहकाचे संतोषाधिक्य घटेल

(D) ग्राहकाचे संतोषाधिक्य अबाधित राहील पण उत्पादकाचे संतोषाधिक्य वाढेल

6. जे खर्च उत्पादनपातळीबरोबर बदलत नाहीत, पण उत्पादन शून्य असल्यास जे खर्च टाळता येतात त्यांना ..................... हे नाव आहे.

(A) निमग्न व्यय

(B) एकूण व्यय

(C) स्थिर व्यय

(D) अव्यक्त व्यय

www.prepp.in



7. Which one is *not* a condition for the combination of inputs to be cost minimizing ?

(A) MRTS $= \frac{MP_L}{MP_K}$

(B) $\frac{MP_L}{w} = \frac{MP_K}{r}$

(C) MRTS $= \frac{w}{r}$

(D) $\frac{MP_L}{MP_K} = \frac{w}{r}$

8. A price taker is :

(A) a firm that accepts different prices from different customers

(B) a consumer who accepts different prices from different firms

(C) a firm that accepts the best offers it can get from its customers

(D) a firm that cannot influence price

7. खालीलपैकी कोणता उत्पादनघटक गट उत्पादनखर्चाच्या किमानीकरणासाठी योग्य अट असू शकत **नाही** ?

(A) MRTS $= \frac{MP_L}{MP_K}$

(B) $\frac{MP_L}{w} = \frac{MP_K}{r}$

(C) MRTS $= \frac{w}{r}$

(D) $\frac{MP_L}{MP_K} = \frac{w}{r}$

8. किंमत स्वीकारकर्ता कोणास म्हटले जाते ?

(A) जी उत्पादनसंस्था निरनिराळ्या ग्राहकांना निरनिराळ्या किंमती आकारते

(B) जो ग्राहक निरनिराळ्या उत्पादनसंस्थांकडून निरनिराळ्या किंमती स्वीकारतो

(C) जी उत्पादनसंस्था आपल्या ग्राहकांकडून सर्वोत्तम किंमती स्वीकारते

(D) जी उत्पादनसंस्था किंमतीवर परिणाम करू शकत नाही

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



9. Cournot equilibrium is NASH equilibrium because :

(A) Joint profits are maximum

(B) Neither firm can gain by deviating unilaterally

(C) Leader can gain by deviating from equilibrium

(D) Both (A) and (B)

10. Consider the following statements :

(I) Monopolist uses quantity discounts for exctracting some consumer surplus.

(II) Monopolist charging different prices for each unit of output leads to competitive level of output.

Select the *correct* answer from the given below :

(A) (I) is true and (II) is false

(B) (I) is false and (II) is true

(C) both (I) and (II) are true

(D) both (I) and (II) are false

9. कुर्नो समतोल हा नॅश समतोल असू शकतो, कारण :

(A) संयुक्त नफा कमाल असतो

(B) एकतर्फी विचलनाने दोन्हीपैकी एकाही उत्पादनसंस्थेचा फायदा होत नाही

(C) समतोलापासूनच्या विचलनाने पुढाकार घेणाऱ्याचा फायदा होतो

(D) वरीलपैकी (A) व (B) योग्य आहे

10. खालील विधाने पहा :

(I) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य प्राप्त करून घेण्यासाठी मक्तेदार संख्यात्मक सवलतींचा वापर करतो.

(II) वस्तूच्या प्रत्येक नगाला निरनिराळ्या किंमती आकारल्याने उत्पादनाची स्पर्धात्मक पातळी गाठली जाते.

खालीलपैकी **योग्य** पर्याय निवडा :

(A) विधान (I) बरोबर आहे व विधान (II) चूक आहे

(B) विधान (I) चूक आहे व विधान (II) बरोबर आहे

(C) (I) व (II) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत

(D) (I) व (II) ही दोन्ही विधाने चूक आहेत

www.prepp.in



11. Let price of X and price of Y be $P_X$ and $P_Y$ and I be the income of the consumer. Suppose price of X and Y increases 5 times, then the budget line would be :

(A) $P_X + P_Y = \frac{1}{10} I$

(B) $P_X + P_Y = \frac{1}{5} I$

(C) $P_X + P_Y = I$

(D) $P_X + P_Y = 5I$

11. 'क्ष' व 'य' वस्तूच्या किंमती अनुक्रमे $P_X$ व $P_Y$ तसेच ग्राहकाचे उत्पन्न I आहे असे माना. जर 'क्ष' व 'य' च्या किंमती Y पटीने वाढल्या, तर किंमतरेषा कोणती असेल ?

(A) $P_X + P_Y = \frac{1}{10} I$

(B) $P_X + P_Y = \frac{1}{5} I$

(C) $P_X + P_Y = I$

(D) $P_X + P_Y = 5I$

12. The Marginal Productivity theory of distribution in a book titled "The Distribution of Wealth" is written by :

(A) J.R. Hicks

(B) David Ricardo

(C) J.B. Clark

(D) Leon Walras

12. विभाजनाचा सीमान्त उत्पादकता सिद्धान्त ...................... याने लिहिलेल्या "The Distribution of Wealth" या पुस्तकात समाविष्ट आहे.

(A) जे.आर. हिक्स

(B) डेव्हिड रिकार्डो

(C) जे.बी. क्लार्क

(D) लिआँ वॉलरास

www.prepp.in



13. Comparison of the equilibrium wage rate and level of employment when there is monopsony in labour market ($W_M$ and $L_M$) and when there is perfect competition in labour market ($W_C$ and $L_C$) indicates that :

(A) $W_M < W_L$ and $L_M > L_C$

(B) $W_M < W_L$ and $L_M < L_C$

(C) $W_M > W_L$ and $L_M < L_C$

(D) $W_M > W_L$ and $L_M > L_C$

14. Demand under uncertainty is associated with the name of :

(A) Von Neumann and Morgenstern

(B) Sweezy

(C) Chamberlin

(D) Samuelson

13. श्रमबाजारात ग्राहक–मक्तेदारी असल्यास वेतनदार आणि रोजगार यातील समतोल ($W_M$ व $L_M$) आणि श्रमबाजारात स्पर्धा असतानाचा समतोल ($W_C$ व $L_C$) यांची तुलना करताना .............. सूचित होते.

(A) $W_M < W_L$ व $L_M > L_C$

(B) $W_M < W_L$ व $L_M < L_C$

(C) $W_M > W_L$ व $L_M < L_C$

(D) $W_M > W_L$ व $L_M > L_C$

14. अनिश्चिततेखालील मागणी ही संकल्पना ................ याच्या/यांच्या नावाशी निगडित आहे.

(A) वॉन न्यूमन आणि मॉर्गनस्टर्न

(B) स्वीझी

(C) चेंबरलिन

(D) सॅम्युअलसन

www.prepp.in



15. Match List I with List II and select the *correct* answer using the codes given below :

**List I**

(*a*) Input-Output Isoquant

(*b*) CES Production Function

(*c*) Duopoly Model

(*d*) Kinked Demand Curve

**List II**

(1) Arrow & Chenery

(2) Leontief

(3) P. Sweezy

(4) Cournot

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (3) | (2) | (4) |
| (B) | (2) | (1) | (3) | (4) |
| (C) | (2) | (1) | (4) | (3) |
| (D) | (1) | (2) | (3) | (4) |

15. सूची I व सूची II मधील जोड्या लावा व खाली दिलेल्या संकेतांकाला वापरून **योग्य** उत्तर निवडा :

**सूची I**

(*a*) आदान-उत्पादन समउत्पादन वक्र

(*b*) CES उत्पादन फलन

(*c*) द्विविक्रेताधिकार प्रतिमान

(*d*) बाकदार मागणी वक्र

**सूची II**

(1) ॲरो व चेनेरी

(2) लिओंटिव्ह

(3) पी. स्वीझी

(4) कुर्नो

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (3) | (2) | (4) |
| (B) | (2) | (1) | (3) | (4) |
| (C) | (2) | (1) | (4) | (3) |
| (D) | (1) | (2) | (3) | (4) |

www.prepp.in



16. User cost of capital appears in :

(A) Keynesian theory of investment

(B) Fisher's theory of investment

(C) Hicks's theory of investment

(D) Jargenson's theory of investment

17. Which one of the following is a correct description about the origin of endogenous growth theory ?

(A) Rejection of CRS assumption

(B) Rejection of exogenous technical change assumption

(C) Rejection of constant savings rate assumption

(D) Rejection of constant population growth rate assumption

16. भांडवलाचा उपयोगकर्ता परिव्यय ............... या सिद्धान्तात नमूद केला आहे.

(A) केन्सचा गुंतवणुकीचा सिद्धांत

(B) फिशरचा गुंतवणुकीचा सिद्धांत

(C) हिक्सचा गुंतवणुकीचा सिद्धांत

(D) जार्गन्सनचा गुंतवणुकीचा सिद्धांत

17. खालीलपैकी कोणते अंतर्जात अभिवृद्धी सिद्धांताच्या मूळ स्रोताचे योग्य वर्णन आहे ?

(A) CRS गृहीत नाकारणे

(B) बाह्य तांत्रिक बदलाचे गृहीत नाकारणे

(C) स्थिर बचत गुणोत्तराचे गृहीत नाकारणे

(D) लोकसंख्येच्या स्थिर अभिवृद्धीदराचे गृहीत नाकारणे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



18. Which one of the following is a *correct* definition of monetary base in the theory of money supply ?
    (A) Sum of currency and bank reserves
    (B) Sum of currency and demand deposits
    (C) Sum of demand deposits and bank reserves
    (D) Sum of currency, demand deposits and bank reserves

19. In square-root formula for demand for money of Baumol, demand for money will be more if :
    (A) Cost per trip to bank decreases
    (B) Cost per trip to bank increases
    (C) Cost per trip to bank does not change
    (D) Expenditure of the individual decreases

18. पैश्याच्या पुरवठ्याच्या सिद्धांतात खालीलपैकी कोणती बरोबर व्याख्या चलनाचा आधार म्हणून स्वीकारता येईल ?
    (A) चलन आणि बँकेकडील राखीव पैश्याची बेरीज
    (B) चलन आणि मागणी ठेवींची बेरीज
    (C) मागणी ठेवी आणि बँकेकडील राखीव पैश्याची बेरीज
    (D) चलन, मागणी ठेवी आणि बँकेकडील राखीव पैसा यांची बेरीज

19. पैशाच्या मागणीचे बॉमोल यांचे जे वर्गमूळ सूत्र आहे त्यानुसार जर .................... पैश्याची मागणी वाढेल.
    (A) बँकेत जाण्याचा प्रत्येक हेलपाट्याचा खर्च घटत असल्यास
    (B) बँकेत जाण्याचा प्रत्येक हेलपाट्याचा खर्च वाढत असल्यास
    (C) बँकेत जाण्याचा प्रत्येक हेलपाट्याचा खर्च बदलत नसल्यास
    (D) व्यक्तीचा खर्च घटत असल्यास

www.prepp.in



20. The difference between short-run and long-run consumption function, according to Simon Kuznets is as follows :

    (A) Long-run APC falling but short-run APC constant

    (B) Long-run APC constant but short-run APC rising

    (C) Long-run APC constant but short-run APC falling

    (D) Both long-run APC and short-run APC falling

21. In IS-LM Model, government expenditure multiplier does *not* depend on :

    (A) Slope of savings function

    (B) Slope of investment function

    (C) Slope of speculative demand function

    (D) Slope of government expenditure function

20. सायमन कुझनेटस्‌च्या मते अल्पकालीन उपभोग फलन आणि दीर्घकालीन उपभोग फलनातील फरक खालील प्रकारचा असतो :

    (A) दीर्घकालीन सरासरी उपभोगप्रवृत्ती घटते पण अल्पकालीन सरासरी उपभोगप्रवृत्ती स्थिर असते

    (B) दीर्घकालीन सरासरी उपभोगप्रवृत्ती स्थिर असते पण अल्पकालीन सरासरी उपभोगप्रवृत्ती वाढते

    (C) दीर्घकालीन सरासरी उपभोगप्रवृत्ती स्थिर असते परंतु अल्पकालीन सरासरी उपभोगप्रवृत्ती घटते

    (D) दीर्घकालीन व अल्पकालीन सरासरी उपभोगप्रवृत्ती घटतात

21. IS-LM प्रतिमानामध्ये सरकारी खर्च गुणक ..................... यावर अवलंबून असत **नाही**.

    (A) बचत फलनाचा उतार

    (B) गुंतवणूक फलनाचा उतार

    (C) सट्टेबाजीच्या मागणी फलनाचा उतार

    (D) सरकारी खर्च फलनाचा उतार

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



22. To bring the economy out of liquidity trap, which one of the following will be an effective policy ?
    (A) A rise in money supply
    (B) A rise in income tax rate
    (C) A rise in government expenditure
    (D) A cut in government expenditure

23. Suppose the following equations are given for IS and LM curves :

    IS curve : $Y = 350 - 1000r$

    LM curve : $Y = 200 + 500r$

    where Y = income and $r$ = rate of interest.

    What will be the equilibrium values of Y and $r$ ?
    (A) $Y = 200, r = 0.04$
    (B) $Y = 250, r = 0.1$
    (C) $Y = 300, r = 0.15$
    (D) $Y = 350, r = 0.2$

22. जर अर्थव्यवस्था रोखता सापळ्यातून मुक्त करायची असेल तर खालीलपैकी कोणता धोरण परिणामकारक ठरेल ?
    (A) पैश्याच्या पुरवठ्यात वाढ
    (B) उत्पन्न कराच्या दरात वाढ
    (C) सरकारी खर्चात वाढ
    (D) सरकारी खर्चात घट

23. जर IS आणि LM वक्रांची समीकरणे खालीलप्रमाणे असतील :

    IS वक्र : $Y = 350 - 1000r$

    LM वक्र : $Y = 200 + 500r$

    येथे Y = उत्पन्न व $r$ = व्याज दर आहेत.

    अशा परिस्थितीत Y व $r$ यांच्या समतोल किंमती काय असतील ?
    (A) $Y = 200, r = 0.04$
    (B) $Y = 250, r = 0.1$
    (C) $Y = 300, r = 0.15$
    (D) $Y = 350, r = 0.2$

www.prepp.in



24. In an economy, given MPC = 3/4, income tax rate = 1/3, the investment multiplier value is :

(A) 2

(B) 3

(C) 4

(D) 5

25. In classical economic models, the full-employment is ensured by :

(A) A vertical AD curve but rising AS curve

(B) A vertical AD curve but falling AS curve

(C) A falling AD curve but vertical AS curve

(D) A falling AD curve but rising AS curve

24. अर्थव्यवस्थेत जर सीमान्त उपभोग प्रवृत्ती 3/4 असेल, उत्पन्न कराचा दर जर 1/3 असेल, तर गुंतवणूक गुणक ..................... असेल.

(A) 2

(B) 3

(C) 4

(D) 5

25. सनातनवादी आर्थिक प्रतिमानांमध्ये पूर्ण रोजगार परिस्थिती कोणत्या पद्धतीने दाखवली जाते ?

(A) क्षितिजलंब समस्त मागणी वक्र व चढता समस्त पुरवठा वक्र

(B) क्षितिजलंब समस्त मागणी वक्र व घसरता समस्त पुरवठा वक्र

(C) घसरता समस्त मागणी वक्र व क्षितिजलंब समस्त पुरवठा वक्र

(D) घसरता समस्त मागणी वक्र व चढता समस्त पुरवठा वक्र

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



26. Under fixed exchange rate, Mundell-Fleming model shows under perfect capital mobility :

(A) Fiscal policy is a failure but monetary policy is effective

(B) Fiscal policy and monetary policy, both are effective

(C) Fiscal policy is effective but monetary policy is a failure

(D) Fiscal policy and monetary policy, both are failure

27. If in an economy average propensity to consume is equal to marginal propensity to consume :

(I) Consumption function starts at origin.

(II) Income elasticity of consumption is equal to 1.

(A) (I) is true and (II) is false

(B) (I) is false and (II) is true

(C) both (I) and (II) are false

(D) both (I) and (II) are true

26. स्थिर विनिमय दर परिस्थितीमध्ये मुंडेल-फ्लेमिंग प्रतिमानात भांडवलाच्या पूर्ण गतिशीलतेच्या संदर्भात :

(A) वित्तीय धोरण अयशस्वी ठरते पण चलनविषयक धोरण परिणामकारक ठरते

(B) वित्तीय धोरण व चलनविषयक धोरण हे दोन्ही परिणामकारक ठरतात

(C) वित्तीय धोरण परिणामकारक ठरते पण चलनविषयक धोरण अयशस्वी ठरते

(D) वित्तीय धोरण व चलनविषयक धोरण हे दोन्ही अयशस्वी ठरतात

27. एखाद्या अर्थव्यवस्थेत सरासरी उपभोग प्रवृत्ती आणि सीमान्त उपभोग प्रवृत्ती समान असेल, तर :

(I) उपभोग फलनाची सुरुवात आरंभस्थानातून होते.

(II) उपभोगाची उत्पन्न लवचिकता एक असते.

(A) (I) सत्य परंतु (II) असत्य

(B) (I) असत्य परंतु (II) सत्य

(C) (I) आणि (II) दोन्ही असत्य

(D) (I) आणि (II) दोन्ही सत्य

www.prepp.in



28. In Ranis-Fei Model, the wage rate in Agriculture sector is equal to :
   (A) Surplus Production per Worker
   (B) Marginal Productivity of Labour
   (C) Average Productivity of Labour
   (D) Net Production per Worker

29. Kaldor's Model of growth identifies the factor causing growth as :
   (A) savings
   (B) capital accumulation
   (C) human capital investment
   (D) technical dynamism

30. Father of Economics, Adam Smith, argued in favour of a policy of :
   (A) protection
   (B) free-trade
   (C) self-sufficiency
   (D) no trade

28. Ranis-Fei प्रतिमानामध्ये शेतीक्षेत्रातील वेतनदर .................. याबरोबर असते.
   (A) दर मजुरामागील अतिरिक्त उत्पादन
   (B) मजुराची सीमान्त उत्पादकता
   (C) मजुराची सरासरी उत्पादकता
   (D) दर मजुरामागील नक्त उत्पादन

29. कॅलडोरच्या अभिवृद्धी प्रतिमानानुसार अभिवृद्धी घडवून आणणारा घटक म्हणजे :
   (A) बचती
   (B) भांडवल संचय
   (C) मानवी भांडवलातील गुंतवणूक
   (D) तांत्रिक गतिकी

30. अर्थशास्त्राचा जनक, ॲडम स्मिथ यांनी कोणत्या धोरणाच्या बाजूने युक्तिवाद केला ?
   (A) संरक्षण
   (B) मुक्त व्यापार
   (C) आत्मनिर्भरता
   (D) व्यापाराचा अभाव

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



31. In the Lewis Model of growth the process of capital accumulation by capitalists results in :
   (A) higher productivity
   (B) reduction of surplus labour
   (C) technical progress
   (D) shortage of unskilled labour

32. The endogenous growth theory states that growth is generated by :
   (A) endogenous population growth
   (B) endogenous technical progress
   (C) endogenous human capital formation
   (D) endogenous productivity growth

33. In Kaldor's growth model, the warranted growth and actual growth becomes equal to each other through :
   (A) change in capital-output ratio
   (B) change in population growth rate
   (C) change in savings ratio
   (D) change in profit share in income distribution

31. लेविसच्या आर्थिक अभिवृद्धी प्रतिमानानुसार भांडवलदारांच्या भांडवल संचयाचा परिणाम म्हणजे :
   (A) वाढती उत्पादकता
   (B) अतिरिक्त श्रमिकांच्या संख्येत घट
   (C) तांत्रिक प्रगती
   (D) अकुशल कामगारांची कमतरता

32. अंतर्जात अभिवृद्धी सिद्धांतानुसार अभिवृद्धी .......................... यामुळे घडून येते.
   (A) अंतर्जात लोकसंख्या वाढ
   (B) अंतर्जात तांत्रिक प्रगती
   (C) अंतर्जात मानवी भांडवल निर्मिती
   (D) अंतर्जात उत्पादकता वाढ

33. कालडोर यांच्या अभिवृद्धी प्रतिमानानुसार शक्य अभिवृद्धीदर आणि प्रत्यक्ष अभिवृद्धीदर .......................... यामार्फत एकमेकांच्या बरोबर येतात.
   (A) भांडवल-उत्पादन गुणोत्तरातील बदल
   (B) लोकसंख्या वाढीच्या दरातील बदल
   (C) बचत गुणोत्तरातील बदल
   (D) उत्पन्न वाटपातील नफ्याच्या हिश्श्यातील बदल

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



34. In Joan Robinson's Model of economic growth capital accumulation depends on :

(A) wage-productivity

(B) agricultural productivity

(C) profit-wage relation and labour productivity

(D) profit ratio

35. In Myrdal's Model of economic development two effects are mentioned :

(A) backwash effects and spread effects

(B) roundabout effects and direct effects

(C) spread effects and interlinkage effects

(D) backwash effects and direct effects

34. जोन रॉबिन्सन यांच्या आर्थिक अभिवृद्धी प्रतिमानानुसार भांडवल संचय .................... यावर अवलंबून असतो.

(A) वेतन–उत्पादकता

(B) कृषी–उत्पादकता

(C) नफा–वेतन संबंध आणि श्रम उत्पादकता

(D) नफा गुणोत्तर

35. मिर्डालच्या आर्थिक विकासाच्या प्रतिमानात पुढील दोन परिणामांचा उल्लेख आहे :

(A) प्रत्याधावी परिणाम व प्रसार परिणाम

(B) टप्पेदार परिणाम व प्रत्यक्ष परिणाम

(C) प्रसार परिणाम आणि परस्परसंबंध परिणाम

(D) प्रत्याधावी परिणाम आणि प्रत्यक्ष परिणाम

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



36. In the dependency theory the central thesis is that :

(A) the developed nations depend on undeveloped nations for resources

(B) the less developed countries (LDCs) depend on the developed countries (DCs)

(C) the market economies depend on the state managed economies

(D) the low income countries depend on middle income countries

37. In Marxian Model ($p$-rate of profit, $s'$-rate of surplus value and $q$-organic composition of capital), then which of the following equation is *correct* :

(A) $p = s'(1 - q)$

(B) $p = q(1 - s')$

(C) $p = s'q(1 - q)$

(D) $p = s'q(1 - s')$

36. अवलंबिता सिद्धांतातील मध्यवर्ती संकल्पना म्हणजे :

(A) विकसित देश हे अविकसित देशांवर उत्पादन साधनांसाठी अवलंबून असतात

(B) अल्पविकसित देश हे विकसित देशांवर अवलंबून असतात

(C) बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्था या राज्य नियंत्रित अर्थव्यवस्थांवर अवलंबून असतात

(D) अल्पउत्पन्नाचे देश हे मध्यम उत्पन्नाच्या देशांवर अवलंबून असतात

37. जर $p$ = नफ्याचा दर, $s'$ = अतिरिक्त मूल्याचा दर आणि $q$ = भांडवलाची सेंद्रीय रचना असेल, तर मार्क्सच्या प्रतिमानानुसार पुढीलपैकी कोणते समीकरण **बरोबर** आहे ?

(A) $p = s'(1 - q)$

(B) $p = q(1 - s')$

(C) $p = s'q(1 - q)$

(D) $p = s'q(1 - s')$

www.prepp.in



38. Which one of the following criteria is chosen by the 14th Finance Commission for inter-se distribution of proceeds from central taxes ?

(A) Socio-economic backwardness

(B) Fiscal capacity

(C) Forest cover

(D) Fiscal discipline

39. Which Finance Commission recommended grant-in-aid to states to cover the entire post devolution revenue deficit ?

(A) 13th Finance Commission

(B) 14th Finance Commission

(C) 12th Finance Commission

(D) 11th Finance Commission

38. 14व्या वित्तआयोगाने केंद्र सरकारच्या करमहसूलाचे राज्या राज्यामध्ये वाटप करण्यासाठी कोणत्या निकषाची निवड केली ?

(A) सामाजिक-आर्थिक मागासपणा

(B) राजकोषीय क्षमता

(C) वनव्याप्त क्षेत्र

(D) राजकोषीय शिस्त

39. केंद्र सरकारच्या कर महसूलाचा हिस्सा राज्यांना वाटप केल्यानंतर राज्यांची उर्वरित महसूली तूट भरून काढण्यासाठी कोणत्या वित्त आयोगाने शिफारस केली ?

(A) 13वा वित्त आयोग

(B) 14वा वित्त आयोग

(C) 12वा वित्त आयोग

(D) 11वा वित्त आयोग

www.prepp.in



40. The grants-in-aid recommended by the Finance Commission are distributed to states from :

(A) Consolidated Fund of India

(B) Consolidated Fund of the States

(C) National Small Savings Fund

(D) National Investment Fund

41. In India, by the year 2013, the money supply ($M_1$) consisted approximately of ...................... of currency with the public and ................ of demand deposits with banks.

(A) 60%, 40%

(B) 50%, 50%

(C) 40%, 60%

(D) 80%, 20%

40. वित्त आयोगांनी शिफारस केलेली साहाय्यक अनुदाने कोणत्या निधितून राज्यांना वाटप केली ?

(A) भारताचा एकत्रित निधी

(B) राज्याचा एकत्रित निधी

(C) राष्ट्रीय अल्पबचत निधी

(D) राष्ट्रीय गुंतवणूक निधी

41. भारतात 2013 वर्षीच्या पैशाच्या पुरवठ्या मध्ये ($M_1$) ...................... लोकांच्या हातातील पैसा आणि .................... बँकाकडे मागणी ठेवी होत्या.

(A) 60%, 40%

(B) 50%, 50%

(C) 40%, 60%

(D) 80%, 20%

www.prepp.in



42. What can you say about the following statements :

(*i*) RRBs in India were first established in 1985.

(*ii*) RRBs are cooperative banks.

Choose the *correct* alternative :

(A) Both statement (*i*) and statement (*ii*) are correct

(B) Both statement (*i*) and statement (*ii*) are wrong

(C) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is wrong

(D) Statement (*i*) is wrong and statement (*ii*) is correct

43. What can you say about the following statements :

(*i*) All nationalized banks in India are scheduled banks.

(*ii*) All scheduled banks in India are nationalized banks.

Choose the *correct* answer :

(A) Both statement (*i*) and statement (*ii*) are wrong

(B) Both statement (*i*) and statement (*ii*) are correct

(C) Statement (*i*) is wrong and statement (*ii*) is correct

(D) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is wrong

42. खालील विधानाबाबत काय म्हणतात येईल ?

(*i*) भारतातील प्रादेशिक ग्रामीण बँका प्रथम 1985 मध्ये स्थापन झाल्या.

(*ii*) प्रादेशिक ग्रामीण बँका सहकारी बँका आहेत.

**योग्य** उत्तर लिहा :

(A) दोन्ही विधाने विधान (*i*) आणि विधान (*ii*) बरोबर आहेत

(B) दोन्ही विधाने विधान (*i*) आणि विधान (*ii*) चूक आहेत

(C) विधान (*i*) बरोबर आणि विधान (*ii*) चूक आहे

(D) विधान (*i*) चूक आणि विधान (*ii*) बरोबर आहे

43. खालील विधानाबाबत काय म्हणतात येईल ?

(*i*) भारतातील सर्व राष्ट्रीयीकृत बँका अनुसूचित बँका आहेत.

(*ii*) भारतातील सर्व अनुसूचित बँका राष्ट्रीयीकृत बँका आहेत.

**योग्य** उत्तर लिहा :

(A) दोन्ही विधाने विधान (*i*) आणि विधान (*ii*) चूक आहेत

(B) दोन्ही विधाने विधान (*i*) आणि विधान (*ii*) बरोबर आहेत

(C) विधान (*i*) चूक आणि विधान (*ii*) बरोबर आहे

(D) विधान (*i*) बरोबर आणि विधान (*ii*) चूक आहे

www.prepp.in



44. In India CRISIL, ICRA and CARE are :

(A) credit certifying agencies

(B) credit rating agencies

(C) credit regulating agencies

(D) credit information agencies

45. EXIM Bank is :

(A) regulatory financial body

(B) private sector commercial bank

(C) specialized financial institution

(D) investment institution

46. Tariff is ineffective when :

(A) price elasticity of demand is unknown

(B) price elasticity of demand is relatively inelastic

(C) price elasticity of demand is inelastic

(D) price elasticity of demand is relatively elastic

44. भारतात CRISIL, ICRA आणि CARE ........................ आहेत.

(A) पत प्रमाणपत्र देणाऱ्या संस्था

(B) पत दर्जा देणाऱ्या संस्था

(C) पत नियमन संस्था

(D) पत माहिती देणाऱ्या संस्था

45. EXIM बँक ........................ आहे.

(A) वित्तीय नियमन करणारी संस्था

(B) खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँक

(C) विशेषीकृत वित्तीय संस्था

(D) गुंतवणूक संस्था

46. प्रशुल्क केव्हा प्रभावशून्य असतो ?

(A) जेव्हा मागणीची किंमत लवचिकता माहित नसते

(B) जेव्हा मागणीची किंमत लवचिकता सापेक्ष अलवचिक असते

(C) जेव्हा मागणीची किंमत लवचिकता ताठर असते

(D) जेव्हा मागणीची किंमत लवचिकता सापेक्ष लवचिक असते

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



47. Which one of the following concepts was propounded by Gerald Meier ?
   (A) Single Factoral Terms of Trade
   (B) Income Terms of Trade
   (C) Net Barter Terms of Trade
   (D) Gross Barter Terms of Trade

48. All international economic transactions of .......................... nature are included in the .......................... account of balance of payments.
   (A) flow, current
   (B) flow, capital
   (C) stock, current
   (D) financial, current

47. खालीलपैकी कोणती संकल्पना जेराल्ड मीयरने मांडली ?
   (A) एक घटक व्यापारशर्ती
   (B) उत्पन्न व्यापारशर्ती
   (C) नक्त वस्तू व्यापारशर्ती
   (D) स्थूल वस्तू व्यापारशर्ती

48. .......................... स्वरूपाचे सर्व आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारतोलाच्या .......................... खात्यात अंतर्भूत केले जातात.
   (A) प्रवाही, चालू
   (B) प्रवाही, भांडवली
   (C) साठा, चालू
   (D) वित्तीय, चालू

www.prepp.in



49. Rybczynski Theorem propounds that :
    (A) Proportionate change in factor endowment leads to equal proportionate change in output
    (B) Proportionate change in exports leads to more than proportionate change in inputs
    (C) Proportionate change in factor endowment leads to more than proportionate change in output
    (D) Proportionate change in factor endowment leads to less than proportionate change in output

50. According to the Stolper-Samuelson Theorem, imposition of tariff has a favourable impact on that factor which is :
    (A) used intensively in the import-competing sector
    (B) used intensively in the export sector
    (C) used less intensively in the export sector
    (D) used less intensively in the import-competing sector

49. रिब्झ्यान्स्कीच्या प्रमेयानुसार :
    (A) घटक मुबलकतेतील प्रमाणशीर बदलामुळे उत्पादनात समान प्रमाणशीर बदल घडून येतो
    (B) निर्यातीतील प्रमाणशीर बदलामुळे आयातीत अधिक प्रमाणशीर बदल घडून येतो
    (C) घटक मुबलकतेतील प्रमाणशीर बदलामुळे उत्पादनात अधिक प्रमाणशीर बदल घडून येतो
    (D) घटक मुबलकतेतील प्रमाणशीर बदलामुळे उत्पादनात कमी प्रमाणशीर बदल घडून येतो

50. स्टॉल्पर-सॅम्युएल्सन प्रमेयानुसार प्रशुल्क आकारणीचा अनुकूल परिणाम त्या उत्पादन घटकावर होतो जो :
    (A) आयात स्पर्धक उत्पादनात तीव्रतेने वापरला जातो
    (B) निर्यात उत्पादनात तीव्रतेने वापरला जातो
    (C) निर्यात उत्पादनात कमी तीव्रतेने वापरला जातो
    (D) आयात उत्पादनात कमी तीव्रतेने वापरला जातो

www.prepp.in



51. According to the mercantilists wealth in the world :
(A) is unlimited
(B) is limited
(C) is irrelevant
(D) diminishing

51. व्यापारवाद्यांच्या मते जगातील संपत्ती .......... आहे.
(A) अमर्याद
(B) मर्यादित
(C) अप्रस्तुत
(D) घटते

52. The existing shares of a company are traded in the :
(A) new issues market
(B) secondary market
(C) tertiary market
(D) primary market

52. कंपनीच्या चालू समभागांची खरेदी-विक्री .......................... या बाजारात होते.
(A) नवीन समभाग बाजार
(B) दुय्यम बाजार
(C) तृतीय बाजार
(D) प्राथमिक बाजार

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



53. Match the following and select the *correct* answer using the codes given below :

**Authors**

(*i*) T.W. Shultz

(*ii*) J.W. Mellor

(*iii*) M.P. Todaro

(*iv*) E. Boserup

**Title of the Books**

(*a*) The Conditions of Agricultural Growth

(*b*) Economic Development in Third World

(*c*) The Economics of Agricultural Development

(*d*) Transforming Traditional Agriculture

**Codes :**

(A) (*i*)–(*d*), (*ii*)–(*c*), (*iii*)–(*b*), (*iv*)–(*a*)

(B) (*i*)–(*c*), (*ii*)–(*d*), (*iii*)–(*a*), (*iv*)–(*b*)

(C) (*i*)–(*d*), (*ii*)–(*b*), (*iii*)–(*c*), (*iv*)–(*a*)

(D) (*i*)–(*b*), (*ii*)–(*a*), (*iii*)–(*d*), (*iv*)–(*c*)

53. जोड्या जुळवा व खालील संकेतांकाला वापरून **योग्य** उत्तर निवडा :

**लेखक**

(*i*) टी.डब्ल्यू. शूल्टझ्

(*ii*) जे.डब्ल्यू. मेलॉर

(*iii*) एम.पी. टोडॅरो

(*iv*) इ. बोसरप

**पुस्तकाचे शीर्षक**

(*a*) द कंडीशन्स ऑफ ॲग्रिकल्चरल ग्रोथ

(*b*) इकोनोमिक डेव्हलपमेन्ट इन थर्ड वर्ल्ड

(*c*) द इकोनॉमिक्स ऑफ ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट

(*d*) ट्रान्सफॉर्मिंग ट्रॅडिशनल ॲग्रिकल्चर

**संकेतांक :**

(A) (*i*)–(*d*), (*ii*)–(*c*), (*iii*)–(*b*), (*iv*)–(*a*)

(B) (*i*)–(*c*), (*ii*)–(*d*), (*iii*)–(*a*), (*iv*)–(*b*)

(C) (*i*)–(*d*), (*ii*)–(*b*), (*iii*)–(*c*), (*iv*)–(*a*)

(D) (*i*)–(*b*), (*ii*)–(*a*), (*iii*)–(*d*), (*iv*)–(*c*)

www.prepp.in



54. Match the following and select the *correct* answer using the codes given below :

**Poverty Alleviation Programme**

(*i*) Integrated Rural Development Programme

(*ii*) Swarnajayanti Gram Swarojgar Yojana

(*iii*) National Social Assistance Programme

(*iv*) Employment Assurance Scheme

**Year**

(*a*) 1999

(*b*) 1995

(*c*) 1993

(*d*) 1977

**Codes :**

(A) (*i*)–(*d*), (*ii*)–(*a*), (*iii*)–(*c*), (*iv*)–(*b*)

(B) (*i*)–(*c*), (*ii*)–(*d*), (*iii*)–(*a*), (*iv*)–(*b*)

(C) (*i*)–(*d*), (*ii*)–(*a*), (*iii*)–(*b*), (*iv*)–(*c*)

(D) (*i*)–(*b*), (*ii*)–(*d*), (*iii*)–(*a*), (*iv*)–(*c*)

54. जोड्या जुळवा व खालील संकेतांकाला वापरून **योग्य** उत्तर निवडा :

**दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रम**

(*i*) एकात्मिक ग्रामीण कार्यक्रम

(*ii*) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

(*iii*) राष्ट्रीय सामाजिक साह्य कार्यक्रम

(*iv*) रोजगार आश्वासन योजना

**वर्ष**

(*a*) 1999

(*b*) 1995

(*c*) 1993

(*d*) 1977

**संकेतांक :**

(A) (*i*)–(*d*), (*ii*)–(*a*), (*iii*)–(*c*), (*iv*)–(*b*)

(B) (*i*)–(*c*), (*ii*)–(*d*), (*iii*)–(*a*), (*iv*)–(*b*)

(C) (*i*)–(*d*), (*ii*)–(*a*), (*iii*)–(*b*), (*iv*)–(*c*)

(D) (*i*)–(*b*), (*ii*)–(*d*), (*iii*)–(*a*), (*iv*)–(*c*)



[P.T.O.

www.prepp.in



55. The share of industrial sector in employment was ................ in 2011.

(A) 26.2 percent

(B) 24.3 percent

(C) 26.9 percent

(D) 25.2 percent

56. The concept of disinvestment was originally introduced by :

(A) Friedman M.

(B) Kaldor N.

(C) Keynes J.M.

(D) Myrdal G.

57. India accounts for about ................ percentage of the world manufacturing output.

(A) 2.4 percent

(B) 1.8 percent

(C) 3.0 percent

(D) 2.8 percent

55. 2011 साली रोजगारातील औद्योगिक क्षेत्राचा हिस्सा ........................ इतका होता.

(A) 26.2 टक्के

(B) 24.3 टक्के

(C) 26.9 टक्के

(D) 25.2 टक्के

56. निर्गुंतवणूक ही संकल्पना प्रथम .................. यांनी सुचित केली आहे.

(A) फ्राईडमन एम.

(B) कॅल्डोर एन.

(C) केन्स जे.एम.

(D) मिर्डाल जी.

57. जगातील कारखानदारी वस्तूंच्या उत्पादनात भारताचा वाटा अंदाजे ................ इतका आहे.

(A) 2.4 टक्के

(B) 1.8 टक्के

(C) 3.0 टक्के

(D) 2.8 टक्के

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



58. Uniformity of exchange rate is possible, due to :

(A) Speculation

(B) Hedging

(C) Arbitrage

(D) Intervention of Central Banks

59. Fiscal deficit is calculated as :

(A) budgetary deficit minus market borrowings

(B) budgetary deficit minus other liabilities of government of India

(C) budgetary deficit plus market borrowings and other liabilities of the government of India

(D) primary deficit plus market borrowings

60. The concept of zero based budget was propounded by :

(A) R.A. Musgrave

(B) J.M. Keynes

(C) Peter A. Pyhr

(D) A.H. Hansen

58. विनिमय दराचा एकसारखेपणा .................... यामुळे शक्य होतो.

(A) सट्टेबाजी

(B) बचाव

(C) मूल्यांतर पणन

(D) मध्यवर्ती बँकेचा हस्तक्षेप

59. राजकोषीय तुटीचे मापन असे केले जाते :

(A) अंदाजपत्रकीय तूट वजा खुल्या बाजारातून घेतलेले कर्ज

(B) अंदाजपत्रकीय तूट वजा भारत सरकारच्या इतर देयता

(C) अंदाजपत्रकीय तूट अधिक खुल्या बाजारातून घेतलेले कर्ज आणि भारत सरकारच्या इतर देयता

(D) प्राथमिक तूट अधिक खुल्या बाजारातील कर्ज

60. शून्याधारित अंदाजपत्रकाची संकल्पना यांनी दिली आहे :

(A) आर.ए. मसग्रेव्ह

(B) जे.एम. केन्स

(C) पीटर ए. पीर

(D) ए. एच. हॅन्सन

www.prepp.in



61. Which one of the following is *not* the source of State Government's Revenue ?

(A) Entertainment tax

(B) Expenditure tax

(C) Agricultural income tax

(D) Land Revenue

62. What can you say about the following statements ?

(*i*) An import quota always raises the domestic price of the imported good.

(*ii*) Import quotas limit imports without raising the domestic price.

Choose the *correct* alternative :

(A) Both (*i*) and (*ii*) are true

(B) (*i*) is true and (*ii*) is false

(C) (*ii*) is true and (*i*) is false

(D) Both (*i*) and (*ii*) are false

61. खालीलपैकी कोणता स्रोत राज्य सरकारच्या महसूलाचा स्रोत **नाही** ?

(A) करमणूक कर

(B) खर्चावरील कर

(C) शेती उत्पन्नावरील कर

(D) भू महसूल

62. खालील विधानांबद्दल काय म्हणता येईल ?

(*i*) आयात कोट्यामुळे नेहमीच आयात वस्तूची देशांतर्गत किंमत वाढते.

(*ii*) आयात कोट्यामुळे देशांतर्गत किंमत न वाढता आयातीवर मर्यादा घातली जाते.

**योग्य** उत्तर लिहा :

(A) (*i*) आणि (*ii*) बरोबर आहेत

(B) (*i*) बरोबर आणि (*ii*) चूक आहे

(C) (*ii*) बरोबर आणि (*i*) चूक आहे

(D) (*i*) आणि (*ii*) चूक आहेत

www.prepp.in



63. The formation of a cooperative institution has been made a fundamental right, as per ........... .

(A) 96th amendment to Indian Constitution

(B) 99th amendment to Indian Constitution

(C) 97th amendment to Indian Constitution

(D) 90th amendment to Indian Constitution

64. Who was the Chairman of 14th Finance Commission of India ?

(A) Vijay Kelkar

(B) Abhijeet Sen

(C) Raghuram Rajan

(D) Y.V. Reddy

63. सहकारी संस्था स्थापित करण्याचा मूलभूत हक्क भारतात ........................ यामुळे साधण्यात आला आहे.

(A) 96वी भारतीय घटनादुरुस्ती

(B) 99वी भारतीय घटनादुरुस्ती

(C) 97वी भारतीय घटनादुरुस्ती

(D) 90वी भारतीय घटनादुरुस्ती

64. भारताच्या चौदाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष कोण होते ?

(A) विजय केळकर

(B) अभिजित सेन

(C) रघुराम राजन

(D) वाय.व्ही. रेड्डी

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



65. When two or more countries come together, remove mutual tariff and quota restrictions and obtain common tariff policy for the rest of the world, such integration is called as ?

(A) Preferential Trading Club

(B) Free Trade Area

(C) Customs Union

(D) Common Market

66. Which system of exchange rate determination is followed in India since 1992 ?

(A) Currency Basket Mechanism

(B) Fixed Exchange Rate

(C) Pure Float System of Exchange Rate

(D) Managed Float System of Exchange Rate

65. जेव्हा दोन किंवा अधिक देश एकत्र येऊन परस्परांवरील प्रशुल्क आणि कोटा निर्बंध नाहीसे करतात आणि उर्वरित देशांकरता सामायिक प्रशुल्क धोरण स्वीकारतात तेव्हा अशा एकत्रीकरणाला .......................... असे म्हणतात.

(A) प्राधान्य व्यापारगट

(B) मुक्त व्यापारक्षेत्र

(C) जकात संघ

(D) सामायिक बाजार

66. भारतात 1992 पासून विनिमय दर निश्चितीची कोणती पद्धती वापरली जाते ?

(A) चलन टोपली यंत्रणा

(B) स्थिर विनिमय दर पद्धती

(C) विनिमयदराचा शुद्ध तरंग पद्धती

(D) विनिमयदराची व्यवस्थापित तरंग पद्धती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



67. In confidence interval estimation, $\alpha = 5\%$, this means that this interval includes the true $\beta$ with probability of :

(A) 5%

(B) 50%

(C) 95%

(D) 45%

68. In standard bivariate regression, the coefficient of determination is given by :

(A) Residual sum of squares divided by total sum of squares

(B) Total sum of squares divided by residual sum of squares

(C) One minus residual sum of squares divided by total sum of squares

(D) One plus residual sum of squares divided by total sum of squares

67. विश्वासर्हता मध्यांतर मापना मधे $\alpha = 5\%$ याचा अर्थ असा होतो की या इंटरवल मधे $\beta$ च्या सत्य मूल्याचा समावेश होण्याची संभाव्यता ही इतकी असते :

(A) 5%

(B) 50%

(C) 95%

(D) 45%

68. प्रमाणित द्विचल प्रतीपगमनात निर्धारक गुणक हा असतो :

(A) शेष वर्गमूळांची बेरीज भागिले वर्गमूळांची एकूण बेरीज

(B) वर्गमूळांची एकूण बेरीज भागिले शेष वर्गमूळांची बेरीज

(C) एक वजा शेष वर्गमूळांची बेरीज भागिले वर्गमूळांची एकूण बेरीज

(D) एक अधिक शेष वर्गमूळांची बेरीज भागिले वर्गमूळांची एकूण बेरीज

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



69. If multicollinearity is perfect in a regression model then the regression coefficients of the explanatory variables are :

(A) Determinate

(B) Indeterminate

(C) Infinite values

(D) Small negative value

70. In classical linear regression model, $x_i$ and $u_i$ are :

(A) Positively correlated

(B) Negatively correlated

(C) Highly correlated

(D) Not correlated

69. जर प्रतीपगमन प्रतिमानात परिपूर्ण बहुसहरेषीयता (मल्टिकोलिनिॲरिटी) असेल तर स्पष्टीकरणात्मक चलांचे सहगुणक (Coefficient of explanatory variable) हे असे असतात :

(A) निश्चित

(B) अनिश्चित

(C) अनंत मूल्य असणारे

(D) लहान उणे मूल्य असणारे

70. सनातन रेखीय प्रतीपगमनात $x_i$ आणि $u_i$ यात :

(A) धन सहसंबंध असतो

(B) ऋण सहसंबंध असतो

(C) खूपच जास्त सहसंबंध असतो

(D) सहसंबंध नसतो

www.prepp.in



71. If input-output coefficient matrix is called A, then technology matrix is :

(A) I – A

(B) $A^{-1}$

(C) $(I - A)^{-1}$

(D) $A^2$

72. In a multiple regression model given by $Y_i = \beta_1 + \beta_2 x_{2i} + \beta_3 x_{3i} + u_i$, the partial regression coefficients are given by :

(A) Both $\beta_1$ and $\beta_2$

(B) Both $\beta_2$ and $\beta_3$

(C) Both $\beta_1$ and $\beta_3$

(D) Both $\beta_1$ and $u_i$

71. जर आदान-प्रदान सहगुणक सारणीचा निर्देश A ने केला असेल, तर तंत्रज्ञान सारणी ही आहे :

(A) I – A

(B) $A^{-1}$

(C) $(I - A)^{-1}$

(D) $A^2$

72. $Y_i = \beta_1 + \beta_2 x_{2i} + \beta_3 x_{3i} + u_i$ या बहुप्रतीपगमन प्रतिमानात अंशिक प्रतीपगमन सहगुणक हे असतात :

(A) दोन्ही $\beta_1$ आणि $\beta_2$

(B) दोन्ही $\beta_2$ आणि $\beta_3$

(C) दोन्ही $\beta_1$ आणि $\beta_3$

(D) दोन्ही $\beta_1$ आणि $u_i$

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



73. Coefficient of variation is given by :

(A) $\frac{\overline{X}}{\sigma} \times 100$

(B) $\overline{X} \cdot \sigma \cdot 100$

(C) $\frac{\sigma}{\overline{X}} \times 100$

(D) $\frac{1}{\sigma\overline{X}} \times 100$

74. The fitted regression equation is given by $\hat{Y}_i = -12 + 0.5x$. What is the value of the residual at the point $x = 50$, $y = 70$ ?

(A) –57

(B) 57

(C) 0

(D) 33

73. विचलनाचा सहगुणक हा असतो :

(A) $\frac{\overline{X}}{\sigma} \times 100$

(B) $\overline{X} \cdot \sigma \cdot 100$

(C) $\frac{\sigma}{\overline{X}} \times 100$

(D) $\frac{1}{\sigma\overline{X}} \times 100$

74. अंदाजित प्रतीपगमन समीकरण $\hat{Y}_i = -12 + 0.5x$ हे आहे. $x = 50$, $y = 70$ या बिंदूने निर्देशित शेष मूल्य इतके आहे.

(A) –57

(B) 57

(C) 0

(D) 33

www.prepp.in



75. Match the following and select the *correct* answer from the codes given below :

**Writers**

(*a*) G.T. Renner

(*b*) Tord Palander

(*c*) August Losch

(*d*) Sargent Florence

**Books**

(*i*) The Market Area Theory of Industrial Location

(*ii*) Geography of Industrial Locationalization

(*iii*) Investment, Location and Size of Plant

(*iv*) The Economics of Location

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*i*) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) |

75. जोड्या जुळवा व खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य उत्तर निवडा :

**लेखक**

(*a*) जी.टी. रेनर

(*b*) टॉर्ड पॅलेण्डर

(*c*) ऑगस्त लॉश्च

(*d*) सार्जण्ट फ्लॉरेन्स

**ग्रंथ**

(*i*) दी मार्केट एरिया थेअरी ऑफ इंडस्ट्रियल लोकेशन

(*ii*) जिऑग्राफी ऑफ इंडस्ट्रियल लोकेशन-लायझेशन

(*iii*) इनव्हेस्टमेंट, लोकेशन ॲण्ड साईज ऑफ प्लॅण्ट

(*iv*) दि इकॉनॉमिक्स् ऑफ लोकेशन

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*i*) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**ROUGH WORK**

Prepp
Your Personal Exam Guide